Slum Rehabilitation Authority
Technical Department
APPROVED
Pune-Pimpri-Chinchwad Area

१०८
०२/०७/२५

झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे.
जा.क्र.झोपुप्रा./ता.१/ १८०५ /२०२५
दिनांक : ०२/०७/२०२५

# झोपडपट्टी पुनर्वसन योजना (प्रशासकीय मान्यता)

(विकास नियंत्रण नियमावली झोपुप्रा, २०२२ मधील नियम क्र. १४.६.१२(१) अन्वये योजनेस अंतिम प्रशासकीय मान्यता)

प्रस्तावना :

१. पुणे पेठ, गुरुवार, सि.स.नं. ७१६ (पै) व ७४७ (पै), नाईक वस्ती येथे वसलेल्या झोपडपट्टी संदर्भात २५९६.९८ चौ. मी. क्षेत्रावर झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविणेसाठी विकसक मे. रॉयल प्रमोटर्स अँड बिल्डर्स यांचेमार्फत दि. २७/११/२०२४ रोजी प्रस्ताव दाखल आहे. त्यानुषंगाने झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणामार्फत प्रस्तावाची छाननी करून ८५.५९% झोपडीधारकांच्या संमतीसह प्रस्ताव दाखल करणेस संमती दिली आहे.

२. सदर मिळकतीवर झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविण्याच्या दृष्टीने विकसकामार्फत या कार्यालयात दाखल करण्यात आलेल्या प्रस्तावास अनुसरून या प्राधिकरणामार्फत दि.१७/०६/२०२५ रोजी उक्त नियमावलीतील नियम क्र. १४.६.१२(१) अन्वये "झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र प्रारुप योजना" सदर मिळकतीवरील झोपडीधारकांना व सर्व संबंधितांसाठी उपलब्ध करून देण्यात आली आहे. प्रारुप योजने संदर्भात प्राप्त दावे/हरकत/सुचना संदर्भातील स्थिती खालीलप्रमाणे आहे.

- सदर मिळकतीवरील कोणत्याही झोपडीधारकाची विहीत मुदतीत सदर प्रारुप योजनेसंदर्भात लेखी हरकत/सुचना अथवा तक्रार या प्राधिकरणास प्राप्त झालेली नाही.

३. दि.१७/०६/२०२५ रोजी प्रसिध्द केलेली प्रारुप योजना या आदेशातील परिच्छेद क्र.३ मधील नमूद बाबींसह अंतिम करण्यात येत असून योजनेस प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे. सदरच्या योजनेत आवश्यकतेप्रमाणे वेळोवेळी बदल करण्यात येतील व ते झोपडीधारकांच्या सहकारी गृहनिर्माण संस्थेस अवगत करण्यात येतील.

४. सदर योजनेद्वारे विकसक मे. रॉयल प्रमोटर्स अँड बिल्डर्स यांना सदर मिळकतीवर झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविणेकरीता या प्राधिकरणाच्या वतीने प्राधिकृत करण्यात येत असून विकसक यांनी उक्त अधिनियमातील व उक्त नियमावलीतील तरतूदीस अधिन राहून सदर योजनेची अंमलबजावणी करणे अनिवार्य राहील. सदर योजना राबविण्यासाठी अपेक्षित असलेले सर्व व्यवस्थापन व होणारा सर्व खर्च करणेची संपूर्ण जबाबदारी विकसकाची आहे.

५. सदर योजनेचे विकसक मे. रॉयल प्रमोटर्स अँड बिल्डर्स यांनी सदर मिळकतीवर विहित मुदतीत प्रकल्प सुरू करणे, बांधकाम व प्रकल्प पूर्ण करणे बंधनकारक राहील.योजना अंमलबजावणी संदर्भातील शासनाचे अन्य संविधानिक प्राधिकरण तसेच झो.पु.प्राधिकरणाचे

सर्व नियम लागू राहतील व त्यांनी वेळोवेळी दिलेल्या निर्देशांचे अनुपालन करणे विकसक यांच्यावर बंधनकारक राहील.

६. या प्रकरणी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ४५ अन्वये विकास/बांधकाम परवानगी (Commencement Certificate) देणेसंदर्भात आदेश स्वतंत्रपणे पारित करण्यात येतील.

सदर योजना राबविण्यास प्रशासकीय मान्यता देण्यात येत असून माझ्या सहीने व कार्यालयाच्या शिक्क्यासह आदेश जारी करण्यात येत आहेत.प्रस्तुतचा निर्णय हा सर्व संबंधितांवर बंधनकारक राहील आणि त्या संदर्भात अपील दाखल करावयाचे असल्यास ते शीर्षस्थ तक्रार निवारण समिती (Apex Grievances Redressal Committee) कडे करता येईल याची नोंद घ्यावी.

स्थळ :- झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे.
दिनांक :- ०२/०७/२०२५

Slum Rehabilitation Authority Technical Department APPROVED Pune-Pimpri-Chinchwad Area

मुख्य कार्यकारी अधिकारी,
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे.

प्रत माहितीस्तव :

१. मा. आयुक्त, पुणे महानगरपालिका.
२. जमिनीचे विकसक व भोगवटादार- मे. रॉयल प्रमोटर्स अँड बिल्डर्स, १०७०, शुक्रवार पेठ, पुणे-४११००२.
३. पुणे पेठ, गुरुवार, सि.स.नं. ७१६ (पै) व ७४७ (पै), नाईक वस्ती.येथील झोपडपट्टीधारकांकरीता माहितीसाठी सदर योजना झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण कार्यालयामध्ये कार्यालयीन वेळेत उपलब्ध करून देण्यात येत आहे. (संगणक अधिकारी, झोपुप्रा., पुणे).